# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 29/07/2020 (बुधवार)

(दुपार)

---

### जबरी संभोग

पो.स्टे. कुही :- दिनांक 10/06/2020 चे 01.00 वा. ते दिनांक 11/06/2020 चे 01.00 वा. सुमारास पिडीत/फिर्यादी वय 17 वर्ष हिच्या सोबत आरोपी नामे- महेश दिलीप कुथे, वय 24 वर्ष, रा. अडेगाव ता. कुही याचे अंदाजे 1 वर्षापासुन ओळख असून प्रेमसंबंध आहे. दिनांक 10/06/2020 रोजी फिर्यादीच्या आत्याच्या मुलीचे लग्न असल्याने ती माढंळला लग्नाला गेली होती. आरोपीने दुपारी 12.45 वा. दरम्यान फिर्यादीच्या वडीलांच्या फोनवर मॅसेज केला की, "मी माढंळला आलो असून, तु मला भेटायला चौकात ये" सदरचा मॅसेज वाचुन फिर्यादी आरोपीला भेटायला गेली असता आरोपी सोबत त्याचे मित्र सुरज राखडे व राकेश मांढरे हे होते. आरोपीने फिर्यादीला आपले एमएच-31/एयु-0139 क्रमांकाच्या स्पेंलडर मोटरसायकलवर बसवुन कुहीचे काळेश्वर मंदीरात नेवुन तिला धमकी देवुन फिर्यादीच्या गळयात मंगळसुत्र घातले व कपाळाला शेदुंर लावले. यानंतर आरोपीचे दोन्ही मित्र माढंळला परत गेले. आरोपी हा फिर्यादीला घेवुन नागपुरला दिघोरी येथे किरायचे रूमवर घेवुन आला व तिच्या सोबत शारीरिक संबध प्रस्थापीत केले. त्या दिवशी रात्र झाल्याने आरोपीने फिर्यादीला दुसऱ्या दिवशी दि. 11/06/2020 चे 01.00 वा. सुमारास कुहीला सोडुन दिले. त्यानंतर फिर्यादीचे मोठी बहीणीचे दि. 24/06/2020 रोजी लग्न असल्याने बदनामी होणार या भितीने फिर्यादी हि पो.स्टेला रिपोर्ट देण्यास गेली नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 376 (2)(एन) भादंवि. सहकलम 6 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलिस निरीक्षक सुचीता मंडावले 9763234548 या करीत आहे.

### विनयभंग

पो.स्टे. केळवद :- दि. 10/02/2020 चे 07:00 वा. ते दि. 25/07/2020 चे सुमारास 16 वर्षीय पिडीत/फिर्यादी हिच्या व्हॉटस ॲप, फेसबुक आयडीवर आरोपी नामे- शुभंम सुधाकर ठाकरे, वय 19 वर्ष, रा. केळवद याने चॅटिंग करून फिर्यादी सोबत जवळीकता साधुन तिला फिरायला घेवुन गेला. तसेच आरोपीने फिर्यादीच्या सोबत स्वतःच्या मोबाईलने फोटो काढले व काढलेले फोटो तिची बदनामी करण्याकरिता स्वतःचे मोबाईलचे व्हॉटसॲप व्दारे ते वायरल केले. त्यावरून आरोपीने फिर्यादीला म्हटले की, "तु माझ्या सोबत लग्न कर व मला शारीरिक संबंध करू दे" असे त्याने तिला वारंवार म्हणुन तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354 (अ), 354 (क), 354 (ड) भादंवि. सहकलम 7, 8, 11, 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि रासकर 9082196080 पो. स्टे. सावनेर या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर